जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचा निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांच्याकडून आढावा >> पान 2

उशिरानं दिलेला न्याय हा कधीही न्याय ठरत नाही >> पान 3

लोकसहभागातूनच ग्रामीण क्रांती शक्य सिनेअभिनेत्री सोनाली कुलकर्णी >> पान 4

**सुविचार**

ज्याच्याजवळ पुस्तक आहे तो एकटा नाही.
– अज्ञात


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 167 ■ रविवार, दि. 25 जानेवारी 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




सुपरस्टार धनुष आणि मृणाल ठाकूरचे गुप्त विवाह? चेन्नईत व्हायरल व्हिडिओने उधळली अफवा

आतील पान

# भक्तीमय वातावरणात श्री गुरुग्रंथ साहिबांचे विधीवत विराजमान

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** असर्जन परिसरीतील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मैदानावर उभारण्यात आलेल्या मुख्य मंडपात आज श्री गुरुग्रंथ साहिबांचे अत्यंत भक्तीमय व मंगल वातावरणात विधीवत विराजमान झाले.

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त आयोजित भव्य कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर हा सोहळा पार पडला.

विराजमान प्रसंगी गुरुबाणीचे मंगल पठण, अरदास व कीर्तन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. गुरुबाणीच्या मधुर स्वरांनी संपूर्ण परिसर आध्यात्मिकतेने भारावून गेला. भाविकांनी सर्व मर्यादांचे पालन करीत शिस्तबद्ध पद्धतीने दर्शन घेत गुरुग्रंथ साहिबांना नमन केले.







या कार्यक्रमाच्या निमित्ताने नांदेड शहर व परिसरात उत्साहाचे वातावरण असून, देश-विदेशातून येणाऱ्या भाविकांच्या स्वागतासाठी प्रशासन व विविध सामाजिक संघटनांनी आवश्यक ती तयारी पूर्ण केली आहे. भाविकांच्या सोयीसाठी दर्शन, स्वच्छता, पाणी व सुरक्षा यासह सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या बलिदानाचे स्मरण करून धर्म, मानवता व सहिष्णुतेचा संदेश देणारा हा समागम समाजासाठी प्रेरणादायी ठरत असून, या कार्यक्रमाचा लाभ भाविकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## शीख समाजाचा इतिहास उलगडणारे विरासत-ए-सीख प्रदर्शन ठरतंय भाविकांचे आकर्षण




दैनिक आपला विदर्भ


**नांदेड/प्रतिनिधी :** शहरातील मोदी मैदानाच्या भव्य ५२ एकर परिसरात सुरू असलेल्या हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमानिमित्त शीख समाजाच्या इतिहासाचे दर्शन घडविणारे विरासत-ए-सीख हे प्रदर्शन उभारण्यात आले आहे. हे प्रदर्शन भाविकांसाठी आकर्षण ठरत असून या कार्यक्रमाला उपस्थिती लावलेले भाविक आवर्जून प्रदर्शनाला भेट देत आहेत.

शीख धर्माच्या स्थापनेपासून ते गुरू गोविंद सिंग यांच्यापर्यंतच्या सर्व गुरूंचा इतिहास, त्यांनी दिलेले योगदान सचित्र स्वरूपात मांडण्यात आला आहे. विशेषतः हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या इतिहासाला उजाळा देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यासोबत शीख योद्धयांनी वापरलेली विविध शस्त्रास्त्रे या प्रदर्शन दालनात ठेवण्यात आली आहेत. शीख धर्माचे पहिले गुरु श्री गुरु नानक जी ते शेवटचे गुरु गोविंद सिंगजी यांचा इतिहास व श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचे कार्य तसेच शीख धर्मासोबतच सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी, उदासीन व भगत नामदेव समाजातील महापुरुषांचाही इतिहास या प्रदर्शनामध्ये मांडण्यात आला आहे.

हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० शहीदी समागमनिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी आलेले भाविक आवर्जून विरासत-ए-सीख या प्रदर्शनाला भेट देत आहेत. त्यामुळे या प्रदर्शनाचे दालन भाविकांनी तुडुंब भरल्याचे चित्र दिवसभर पाहायला मिळाले. आज, २५ जानेवारी २०२६ रोजी या प्रदर्शनाचा समारोप होणार आहे.

# आता ‘वंदे मातरंम’ गायनावेळी देखील उभे राहणे बंधनकारक...? गृह मंत्रालयाची उच्चस्तरीय बैठक

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्र सरकार राष्ट्रीय गीत वंदे मातरंमला राष्ट्रगीत जन गण मन सारखा दर्जा देण्याचा आणि त्यासारखा प्रोटोकॉल तयार करण्याचा विचार करत आहे. एका वृत्तानुसार या महिन्याच्या सुरूवातीला केंद्रीय गृह मंत्रालयाने या मुद्द्यावर सविस्तर चर्चा करण्यासाठी एक उच्चस्तरीय बैठक घेतली होती. भारताच्या संविधानानुसार राष्ट्रगीत आणि राष्ट्रीय गीत या दोघांनाही एक विशेष सन्मान प्राप्त आहे. मात्र कायदेशीर आणि प्रोटोकॉलच्या बाबतीत दोन्हीमध्ये मोठे अंतर आहे.



राष्ट्रगीत गात असताना उभे राहणे बधनकारक आहे. याचा अपमान केल्यास त्याला राष्ट्रीय सन्मान अपमान निवारण अधिनियम १९७१ अनुसार शिक्षा होते. तर राष्ट्रीय गात वंदे मातरंम गायनावेळी उभे राहणे किंवा एक विशिष्ठ मुद्रा मेंटेन करण्याबाबत कोणतेही कायदेशीर लिखित नियम नाहीयेत.

गृहमंत्रालयाच्या बैठकीत 'या'वर चर्चा

याबाबतचे वृत्त इंडियन एक्सप्रेसने दिलं होतं. त्यांनी सूत्रांच्या हवाल्याने सांगितलं की, 'गृह मंत्रालयात झालेल्या बैठकीत या मुद्द्यावर चर्चा झाली. यावेळी राष्ट्रीय गीत गायन नियम आणि निर्देश आणि सन्मानाची पद्धत याबाबत चर्चा झाली. बैठकीत वंदे मातरंम गायनाची वेळ, स्थान आणि पद्धत याबाब स्पष्ट नियम तयार करायला हवेत का? राष्ट्रीय गीत गाण्यापूर्वी राष्ट्रगीतासारखे उभे राहणे बंधनकारक करता येईल का? राष्ट्रीय गीताचा अपमान करणाऱ्यावर दंडात्मक आणि कायदेशीर कारवाई करता येईल का? यावर चर्चा करण्यात आली. केंद्र सरकार वंदे मातरंम बाबत वर्षभर उत्सव साजरा केला जात आहे. भाजपने काँग्रेसवर तुष्टीकरणाचे राजकारण केल्याचे म्हणत राष्ट्रीय गीताला कमी दर्जा दिल्याचा आरोप केला आहे.

वादाचं मूळ काय

१९३७ मध्ये काँग्रेसच्या अधिवेशनावेळी वंदे मातरंम गीताची काही कडवी हटवण्यात आली होती. भाजपनं आरोप केला की यामुळेच विभाजनाची बिजे रोवली गेली. काँग्रेसने भाजपवर इतिहासाची मोडतोड करून तो सांगितला जात आहे. पश्रि्चम बंगालच्या निवडणुकीच्या तोंडावर या मुद्द्याला हवा दिली जात आहे.

वंदे मातरंम बाबत सध्या न्यायालयात देखील लढा सुरू असून विशेष म्हणजे केंद्र सरकारने २०२२ मध्ये सर्वोच्च न्यायालयात राष्ट्रीय गीताबाबत कोणतेही दंडात्मक तरतूदीबाबतचे निर्देश देण्यात आलेले नाहीत.

बंकीम चंद्र चट्टोपाध्याय यांनी लिहिलेले वंदे मातरंम हे स्वदेशी आंदोलनादरम्यान स्वातंत्र्य चळवळीचे एक स्लोगन झालं होते. आता सरकार या गीताला त्याची गतवैभव मिळवून देणार असल्याचा दावा करत आहे.

## आम्ही कुठल्याही परिस्थितीत मुंबईत बिहार भवन बांधणारच, बिहारच्या मंत्र्याचं राज ठाकरेंना ओपन चॅलेंज

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतील बिहार भवनाला विरोध करणारे फालतू आणि विकृत मानसिकतेचे लोक आहेत. मुंबईत बिहार भवन उभारु देणार नाही, असे हे लोक म्हणतात. महाराष्ट्र कोणाच्या बापाचा आहे का? या देशात कुठेही कोणाचीही जबरदस्ती चालणार नाही. मुंबईत कोणत्या राजाची राजवट आहे का, राज ठाकरे हे काय तिकडचे राजे लागून गेले आहेत का? आम्ही कोणत्याही परिस्थितीत मुंबईत बिहार भवन उभारणारच, असे वक्तव्य बिहार सरकारमधील मंत्री अशोक चौधरी यांनी केले आहे.

मुंबईतील बिहार भवन हे एका भावनेतून उभारले जात आहे. बिहारमधून अनेक लोक कॅन्सर व अन्य रोगांच्या उपचारासाठी मुंबईत जातात. त्या लोकांच्या सोयीसाठी हे बिहार भवन बांधले जात आहे. अनेक राज्यांमध्ये बिहार भवन आहे. त्याप्रमाणे मुंबईतही बिहार भवन बांधले जाईल, असे अशोक चौधरी यांनी म्हटले. मुंबईतील बॉम्बे पोर्ट ट्रस्टच्या जागेवर बिहार भवन बांधण्याची योजना आहे. मात्र, मनसेने बिहार भवनाला विरोध केला आहे. आता अशोक चौधरी यांच्या वक्तव्यानंतर हा वाद पेटण्याची शक्यता आहे.

अशोक चौधरी यांच्या या टीकेला मनसेचे नेते अविनाश अभ्यंकर यांनी प्रत्युत्तर दिले आहे. अशोक चौधरी यांनी आधी आपले स्वत:चे राज्य सांभाळावे. दुसऱ्यांना अक्कल शिकवू नये. स्वत:ची राज्य नीट ठेवलीत तर तुमचे लोक बाहेर जाणार नाहीत. देशभरात बिहारबद्दल काय बोललं जातं, हे एकदा अशोक चौधरी यांनी जाणून घ्यावे. महाराष्ट्र हा मराठी माणसाचा आहे. देवाने तोंड दिलंय म्हणून काहीही बोलू नये, असे अविनाश अभ्यंकर यांनी म्हटले.

दक्षिण मुंबईतील पोर्ट ट्रस्टच्या जागेवर ३० मजली बिहार भवन उभारण्याची योजना आहे. दिल्लीतील बिहार भवनाप्रमाणेच मुंबईतील हे भवन देखील सर्व आधुनिक सुविधांनी सुसज्ज असणार आहे.

# २६ जानेवारी प्रजासत्ताकदिनाच्या निमित्ताने सरकारच्या नवीन ‘लाडकी लेक’ योजनेची घोषणा !

**मुंबई/प्रतिनिधी:** राज्याचे शिक्षणमंत्री विश्वंभर राजशिर्के यांनी नुकत्याच झालेल्या एका पत्रकार परिषदेत काही महत्त्वाच्या योजनांची घोषणा केली होती. त्यातलीच एक 'लाडकी लेक योजना' आता लाँच होणार असून, या योजनेचे उद्धाटन खुद्द मा.शिक्षणमंत्री विश्वंभर राजशिर्के आणि त्यांची मुलगी श्रावणी यांच्या हस्ते होणार आहे. यातून वडील आणि मुलीचे नाते अधिक दृढ करणे आणि मुलींना अधिक चांगलं शिक्षण देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. मात्र, श्रावणीला मिळणारे हे महत्त्व अलकनंदाला सहन होत नाहीये. श्रावणीला या सोहळ्यापासून दूर ठेवण्यासाठी अलकनंदा एक भयानक खेळ खेळते. ती जाणीवपूर्वक असा कट रचते ज्यामध्ये श्रावणीचा अपघात होतो. श्रावणी जखमी झाल्याने राजशिर्के कुटुंबात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

श्रावणीच्या दुखापतीमुळे विश्वंभर राजशिर्के अत्यंत संतापतात आहेत. हाताला दुखापत झालेली असताना श्रावणीला उद्धाटन सोहळ्याला उपस्थित राहणे शक्य नाही आणि यामुळे त्यांच्या प्रतिमेला तडा जाऊ शकतो. आणि या रागाच्या भरात ते श्रावणीलाच याचा दोष देऊ लागतात. श्रावणीच्या अडचणीत भर पडलेली असतानाच, नेहमीप्रमाणे शुभंकर तिच्या मदतीला धावून येणार आहे. शुभंकर अत्यंत हुशारीने उच्च अधिकाऱ्यांशी संपर्क साधत विश्वंभर राजशिर्केची समजूत घालण्यास विनंती करतो. तो पटवून देतो की श्रावणीच्या हाताला दुखापत असली तरी ती कार्यक्रमात सहभागी होऊ शकते आणि तिच्यावर कोणताही ताण येणार नाही याची पूर्ण काळजी घेतली जाईल. आता शुभंकरचा हा प्रयत्न यशस्वी होऊन विश्वंभर राजेशिर्के यांचे मन वळवण्यात तो यशस्वी होणार का, हे पाहणे उत्सुकतेचे असणार आहे.

एकीकडे शुभंकरचे प्रयत्न आणि दुसरीकडे श्रावणीला रोखण्यासाठी अलकनंदाची नवी खेळी, अशा दुहेरी पेचात श्रावणी अडकली आहे.




# आमदार सिद्धार्थ खरात यांच्या नेतृत्वाखाली मातोश्रीवर भव्य जाहीर प्रवेश

**मुंबई/प्रतिनिधी:** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला राज्यपातळीवर मोठे बळ मिळाले असून, मेहकरलोणार विधानसभा मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांच्या नेतृत्वाखाली बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर तालुक्यातील अनेक प्रमुख नेत्यांनी मुंबई येथील मातोश्री निवासस्थानी पक्षात जाहीर प्रवेश केला. डॉ. शेषराव बदर (सोनाटी), अ‍ॅड. गणेश देवकर (जानेफळ), संजय सुळकर (माजी सरपंच, उटी), नागेश शिंगणे (कळंबेश्वर, उद्योजक), राजेंद्र महाराज तळेकर यांच्यासह अनेक प्रभावी कार्यकर्त्यांनी शिवसेनेत सहभाग नोंदविला. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते सर्वांचा शिवबंधन सोहळा संपन्न झाला. यावेळी शिवसेना नेते विनायक राऊत, मिलिंद नार्वेकर, रवी म्हात्रे, नगराध्यक्ष किशोर गारोळे, तालुका संघटक संजय वडतकर, तालुका युवा अधिकारी अ‍ॅड. आकाश घोडे, प्रभाकर बनसोड आदी मान्यवर उपस्थित होते.





या प्रसंगी उद्धव ठाकरे यांनी पक्षात नव्याने दाखल झालेल्या कार्यकर्त्यांचे स्वागत करत शिवसेनेची भूमिका, राज्यातील जनहिताचे प्रश्न व आगामी राजकीय वाटचाल याबाबत मार्गदर्शन केले.

या जाहीर प्रवेशामुळे बुलढाणा जिल्ह्यासह विदर्भातील शिवसेना (उबाठा) संघटना अधिक मजबूत होणार असून, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाला राज्यात सकारात्मक वातावरण निर्माण झाल्याचे राजकीय विश्लेषकांकडून सांगितले जात आहे. आमदार सिद्धार्थ खरात यांच्या नेतृत्वाखाली पक्ष संघटन अधिक विस्तारत असल्याने राज्यातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे.

## महाराष्ट्रासाठी दावोस जागतिक दालन

दावोस आणि महाराष्ट्र यांचे नाते आता केवळ औपचारिक राहिलेले नाही, ते परस्परपूरक झाले आहे. महाराष्ट्रासाठी दावोस हे जागतिक दालन आहे, तर दावोससाठी महाराष्ट्र हा भारताच्या वाढीचे इंजिन. म्हणूनच, देवेंद्र फडणवीस यांच्या या दौऱ्यात विक्रमी गुंतवणूक यंदाही महाराष्ट्रात आली. दावोस म्हणजे हिमाच्छादित स्वित्झर्लंडमधील एक लहानसे शहर, इतकीच त्याची ओळख मर्यादित नाही; तर दावोस म्हणजे जागतिक अर्थव्यवस्थेची नाडी तपासणारी प्रयोगशाळाच. 'वर्ल्ड इकोनॉमिक फोरम'च्या या व्यासपीठावर कोणते देश, कोणती राज्ये आणि कोणते उद्योग पुढील दशकाचे नेतृत्व करणार, याची दिशा स्पष्ट होत असते. अशा व्यासपीठावर महाराष्ट्राने सलग काही वर्षे केलेली चमकदार कामगिरी ही निव्वळ आकड्यांची बेरीज नसून, महाराष्ट्रातील देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारच्या धोरणात्मक प्रगल्भतेची आणि प्रशासनिक विश्वासार्हतेची ती पोचपावती ठरत आहे. यंदाच्या दावोस दौऱ्यात महाराष्ट्राने तब्बल ३० लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक करार करण्यापर्यंत मजल मारली. याआधी २०२५ मध्ये सुमारे १४.९५ लाख कोटी, २०२४ मध्ये ३.५३ लाख कोटी, २०२३ मध्ये १.३७ लाख कोटी आणि २०२२ मध्ये सुमारे दोन लाख कोटी रुपयांची गुंतवणूक दावोसच्या माध्यमातून झाली होती. गुंतवणुकीचा हा चढता आलेख पाहिला, तर महाराष्ट्राची गुंतवणूक क्षमता वर्षागणिक कशी विस्तारत गेली, हे सहज लक्षात येते. पण, हा प्रवास योगायोगाने घडलेला नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट शब्दांत सांगितले की, आजच्या भू-राजकीय परिस्थितीत 'रिलेव्हंट' राहायचे असेल, तर दावोससारख्या जागतिक व्यासपीठावरची उपस्थिती ही अत्यंत आवश्यक अशीच. कारण, इथे गुंतवणूकदारच असतात असे नाही, तर जगाची पुढील दिशा ठरवणारे राजकीय नेते, तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रणी आणि नव्या अर्थव्यवस्थेचे शिल्पकार उपस्थित असतात. 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स', 'फ्युचर टेक्नोलॉजी', 'ग्रीन एनर्जी', 'सप्लाय चेन रिअलाईनमेंट' अशा संकल्पनांचे प्रत्यक्ष दर्शन इथे घडते. महाराष्ट्रासारख्या औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्याने या चर्चेच्या केंद्रस्थानी राहणे ही गरज आहे, 'लक्झरी' नाही. या गुंतवणूक करारांचे महत्त्व रकमेपुरतेच मर्यादित नाही. उद्योग, सेवा क्षेत्र, शेती, तंत्रज्ञान, लॉजिस्टिस, ऊर्जा अशा विविध क्षेत्रांत हे करार झाले आहेत. विशेष म्हणजे, यातील सुमारे ८३ टक्के गुंतवणूक ही थेट विदेशी गुंतवणूक आहे. केवळ भांडवलच असे नव्हे, तर जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान, व्यवस्थापन कौशल्य आणि बाजारपेठांशी थेट जोड महाराष्ट्रात येत आहे. उर्वरित गुंतवणूकही विदेशी तंत्रज्ञानावर आधारित असून, आयात-प्रतिस्थापनाच्या दृष्टीने तीदेखील अत्यंत महत्त्वाचीच. दावोसच्या गुंतवणुकीचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे, फडणवीसांनी साधलेला प्रादेशिक समतोल. विरोधकांकडून वारंवार असा आरोप केला जातो की, येणारी गुंतवणूक ही मुंबई, पुण्यापुरती मर्यादित राहते. मात्र, यंदाच्या दावोस करारांनी विरोधकांचा हा आरोप फोल ठरवण्याचे मोलाचे काम केले. कोकणात १६ टक्के, 'एमएमआर'मध्ये २२ टक्के, विदर्भात १३ टक्के, तर उर्वरित ५० टक्के गुंतवणूक राज्याच्या इतर भागांत गेली आहे. उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, अहिल्यानगरमध्ये सुमारे ५० हजार कोटींची गुंतवणूक आली आहे. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर हे नवे गुंतवणुकीचे क्षेत्र म्हणून उदयास आले असून, तिथे ५५ हजार कोटींची गुंतवणूक झाली आहे. नागपूर विभाग आणि विदर्भात २.७ लाख कोटी, तर कोकणात ३.५ लाख कोटींची गुंतवणूक ही प्रादेशिक विकासाच्या दृष्टीने मैलाचा दगड ठरणारी आहे. महाराष्ट्र आजही जागतिक गुंतवणुकीचे केंद्र का आहे, याचे उत्तर या धोरणात्मक सातत्यात दडलेले आहे. महायुती सरकारने राबवलेली उद्योगस्नेही धोरणे, सुलभ परवानगी प्रणाली, पायाभूत सुविधा क्षेत्रात केलेली मोठी गुंतवणूक, वीज-पाणी-लॉजिस्टिसची उपलब्धता आणि कुशल मनुष्यबळ हे सगळे घटक एकत्र आले की, गुंतवणूकदारांचा विश्वास प्रस्थापित होतो. गुंतवणूकदारांसाठी केवळ करसवलती महत्त्वाच्या नसतात, तर 'इज ऑफ डुईंग बिझनेस' प्रत्यक्षात अनुभवायला मिळतो का, हे निर्णायक ठरते. महाराष्ट्राने ही विश्वासार्हता कमावली आहे. उद्धव ठाकरे यांच्या काळात त्यांच्या नाकर्त्या धोरणांमुळे, उद्योगपतींच्या निवासस्थानी स्फोटके ठेवण्याच्या प्रकारांमुळे, पोलिसांना खंडणी वसुलीचे अधिकार दिल्यामुळे राज्यातील उद्योग परराज्यात जाताना संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले. स्वतःच्या अकार्यक्षमतेचे खापर मात्र त्यांनी केंद्र सरकारवर फोडले होते. याच पार्श्वभूमीवर 'महाराष्ट्रातील कंपन्यांशी करार करायचे असतील, तर दावोसला कशाला जायचे?' असा सवाल उपस्थित करणारी विरोधकांची टूलकीट राजकीय अपरिपक्वतेचे दर्शन घडवते. दावोस हे निव्वळ करार करण्याचे ठिकाण नाही; तर ते नेटवर्किंग, विश्वासनिर्मिती आणि दीर्घकालीन भागीदारीचे व्यासपीठ आहे. फडणवीसांनी यावर विरोधकांचा खरपूस समाचार घेतला आणि आकड्यांसह उत्तर दिले. या तुलनेत मागील काळात दावोस दौऱ्यांचे फलित काय होते? हा प्रश्न आपोआपच उभा राहतो. २०२२ मध्ये तत्कालीन पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे, उद्योगमंत्री सुभाष देसाई आणि ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी दावोसला हजेरी लावली होती. मात्र, त्या काळातील गुंतवणूक आणि आजच्या महायुती सरकारच्या काळातील गुंतवणूक यांची तुलना केली, तर फरक स्पष्ट दिसतो. दावोसला जाणे महत्त्वाचे; पण तिथून काय घेऊन येतो, हे अधिक महत्त्वाचे असते. या यशामागे केंद्र सरकारच्या धोरणात्मक पाठबळाचाही मोठा वाटा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताला जागतिक गुंतवणुकीसाठी खुले, स्थिर आणि विश्वासार्ह गंतव्य म्हणून उभे केले. 'मेक इन इंडिया', 'डिजिटल इंडिया', 'गतिशक्ती' यांसारख्या उपक्रमांनी राज्यांना जागतिक स्पर्धेत उतरायला सक्षम केले. त्याचाच लाभ महाराष्ट्राला मिळताना दिसतो. दावोसच्या यशाकडे 'एमओयू साईन झाले' अशा चष्म्यातून पाहणे योग्य ठरणार नाही. यातील किती प्रकल्प प्रत्यक्षात जमिनीवर उतरतात, किती रोजगारनिर्मिती होते आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला किती चालना मिळते, हे पुढील काळात महत्त्वाचे ठरेल. मात्र, फडणवीसांनी स्पष्ट केल्याप्रमाणे याआधीच्या घोषणांचे रूपांतर प्रत्यक्ष गुंतवणुकीत झाले आहे, हा अनुभव आजच्या दाव्यांना विश्वासार्ह बनवतो.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचा निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांच्याकडून आढावा

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** विभागातील छत्रपती संभाजीनगर, परभणी, लातूर आणि धाराशिव या चार जिल्ह्यांत जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणूका ५ फ ेब्रुवारी २०२६ रोजी होणार असून ७ फ ेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणुकांच्या पार्श्वभुमीवर जिल्हानिहाय तयारीचा आढावा आज राज्य निवडणूक आयूक्त दिनेश वाघमारे यांनी घेतला. विभागात करण्यात आलेल्या निवडणुकांच्या तयारीबाबत समाधान व्यक्त करून मतदान प्रक्रिया निर्भय वातावरणात पार पडेल आणि मतदानाच्या टक्केवारीत आणखी वाढ होईल, असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला. त्याचबरोबर त्यांनी मतदारांमध्ये मतदान करण्याविषयी आणखी मोठ्याप्रमाणात जनजागृती करण्याच्या सुचनाही सर्व प्रशासकीय यंत्रणांना दिल्या.

येथील विभागीय आयुक्त कार्यालयात घेण्यात आलेल्या आढावा बैठकीस विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, राज्य निवडणूक आयोगाचे उपसचिव सुर्या कृष्णमुर्ती, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, परभणीचे जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर-घुगे, धाराशिवचे जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, छत्रपती संभाजीनगरचे पोलीस आयुक्त प्रविण पवार, पोलीस अधीक्षक डॉ.विनय राठोड, परभणीचे पोलीस अधीक्षक विरेंद्रसिंह परदेशी, धाराशिवच्या पोलीस अधीक्षक रितू खोकर प्रत्यक्ष उपस्थित होते. तर नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरिक्षक शहाजी उमाप, लातूर पोलीस अधीक्षक अमोल तांबे व सागर पाटील सहाय्यक पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) महाराष्ट्र राज्य, मुंबई हे दुरदृष्यप्रणालीव्दारे उपस्थित होते.

मतदानाविषयी जागृती व्हावी व मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या मतदार जनजागृती(स्वीप) उपक्रमांचे श्री. वाघमारे यांनी कौतुक करत इतर जिल्ह्यांनीही मतदार जनजागृती उपक्रम मोठ्या प्रमाणात राबविण्याचेही निर्देश दिले. तसेच मतदान करण्याच्या प्रकियेविषयी मतदारांमध्ये विविध प्रसिद्धी माध्यमांतून जनजागृती करावी, वृध्द(वय ८० वर्षावरील), गरोदर महिला, दिव्यांग व्यक्ती यांना मतदान करणे सोयीचे होण्याच्या दृष्टीने उपाय योजना करण्यात याव्यात. मतदार याद्यांतील दुबार मतदारसंख्या कमी करण्याच्या दृष्टीने दुबार नाव नोंदणी असलेल्या मतदारांकडून संमंतीपत्रे भरून घेण्याचे काम गांभीर्याने करावे. त्याचबरोबर आचारसंहिता काळात प्रशासनाने केलेल्या कारवाईसही विविध माध्यमांव्दारे प्रसिद्धी देण्याच्या सूचना श्री. वाघमारे यांनी यावेळी दिल्या.



राज्य निवडणूक आयोग २०१० पासून मतदानावेळी मार्कर पेनची शाई वापरत आहे. परंतू यावेळी जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी लोकसभा, विधानसभा निवडणूकीप्रमाणे म्हैसूर शाईचा वापर करण्यात येणार असल्याचे निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूक प्रक्रिया भयमुक्त व सुरक्षितरित्या पार पाडण्याच्या अनुषंगाने सर्व जिल्हाधिकारी यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी मतदारांच्या प्रमाणात पुरेसे मतदान केंद्रे, इव्हिएम मशीनची उपलब्धता, मतदान केंद्रावर मतदान अधिकारी व कर्मचारी यांची व्यवस्था, मतदान प्रक्रियेतील अधिकारी व कर्मचारी यांचे आवश्यक प्रशिक्षण देण्याची कार्यवाही, स्ट्राँगरूमची व्यवस्था व सुरक्षा करण्यात आली असल्याचे सांगितले. तसेच मतदारांमध्ये मतदानाविषयी जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविले जात आहे, याबाबत संगणकिय सादरीकरण केले.

मतदार यांद्यांतील दुबार नावांच्याबाबत कारवाई करण्यात येऊन दुबार मतदारांकडून दुबार मतदान करणार नसल्याचे संमंतीपत्रे भरुन घेण्याची कारवाई करण्यात येत असल्याचे सांगितले. त्याचबरोबर आचारसंहितेचे उल्लंघन होऊ नये म्हणून सर्व राजकिय पक्षांशी संवादावर भर दिला जात आहे. तर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस अधीक्षकांसोबत वेळोवेळी बैठका व संवाद करण्यात येत असल्याचे सांगितले.

तसेच सर्व पोलीस अधीक्षक यांनी निवडणुकीच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या प्रतिबंधात्मक उपाययोजना, भरारी पथके, स्थिर पथके, व्हिडिओ सर्वे क्षक पथके, वॉरंट बजावणी, अवैध्य मद्य विक्री वर कारवाई व कायदासुव्यस्थेच्या दृष्टीने सर्व उपाययोजना करण्यात येत असल्याचे सांगून मतदानाच्या दिवशी व मतमोजणीच्या दिवशी बंदोबस्तकामी मनुष्यबळाची उपलब्धता व आवश्यकता आदीबाबत माहितीचे संगणकिय सादरीकरण केले.

पोलीस महानिरिक्षक वीरेंद्र मिश्र, नांदेड विशेष पोलीस महानिरिक्षक शहाजी उमाप यांनीही जिल्ह्यांत निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर कायदा व सुव्यस्था राखण्यात येत असल्याचे सांगत संवेदनशिल मतदान केंद्रे असलेल्या ठिकाणी कडेकोट बंदोबस्त लावण्यात येणार असल्याचे सांगितले. जिल्ह्यांच्या सीमा भागात नाका बंदी करण्यात येत असून करण्यात आलेल्या व करण्यात येत असलेल्या प्रतिबंधात्मक कारवाईसंदर्भात माहिती दिली. तसेच निवडणुका निर्भय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

# श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी वर्षानिमित्त निघालेल्या भव्य नगर कीर्तनात अभूतपूर्व उत्साह!

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या महान शहीदी समागम सोहळ्यानिमित्त आज नांदेड नगरी भक्तीच्या रंगात न्हाऊन निघाली. बोले सो निहाल... सत श्री अकालचा गगनभेदी जयघोष, आकाशातून हेलिकॉप्टरद्वारे होणारी पुष्पवृष्टी आणि या सोहळ्यात संत, भाविक, लोकप्रतिनिधी यांच्यासह प्रशासकीय अधिकारी यांचा ओसंडून वाहणारा उत्साह... अशा पवित्र आणि मंगलमय वातावरणात आज भव्य नगर कीर्तन सोहळा पार पडला.

या ऐतिहासिक नगर कीर्तनाला आज (दि. २४) सकाळी ८ वाजता तखत सचखंड श्री हजूर अबचल नगर साहिब जी येथून प्रारंभ झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला गुरुद्वारामध्ये विधिवत अरदास करण्यात आली. यानंतर गुरुद्वाराच्या गेट क्रमांक १ जवळ श्री गुरु ग्रंथ साहिबजींची पालखी येताच नांदेड पोलीस दलाच्या वतीने विधिवत मानवंदना देण्यात आली. या सोहळ्याचे सर्वात विलोभनीय दृश्य म्हणजे हेलिकॉप्टरने गुरुद्वारावर केलेली पुष्पवृष्टी.



भव्य नगर कीर्तन मुख्य जत्थेदार संत बाबा कुलवंत सिंघ जी, भाई जोतिनदर सिंघ जी, मुख्य ग्रंथी भाई कश्मीर सिंघ जी, भाई रामसिंघ जी, भाई गुरुमीत सिंघ जी या पंच प्यारे साहिबान यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली काढण्यात आले.

सुशोभित आणि भव्य रथामध्ये श्री गुरु ग्रंथ साहिबजी विराजमान होते. या पवित्र पालखीमध्ये भाई कश्मीर सिंघ जी यांनी पवित्र सेवा अत्यंत भक्तीभावाने केली.

राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, खासदार अशोक चव्हाण, शहीदी समागम समितीचे राज्य समन्वयक रामेश्वर नाईक आदींसह लोकप्रतिनिधी यांनी विशेष उपस्थिती लावून गुरुचरणी नतमस्तक होत कीर्तनात सहभाग नोंदवला.

तसेच जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार (भा.पो.से.) आणि नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकाचे आयुक्त महेशकुमार डोईफोडे, गुरुद्वारा बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंग (से .नि. भाप्रसे), त्यांचे सहकारी जसविंत सिंघ (बॉबी) आणि अधीक्षक हरजितसिंग कडेवाले यांनीही उपस्थित राहून नियोजनात सक्रिय सहभाग घेतला.

या नगर कीर्तनात शीख धर्माची परंपरा आणि महाराष्ट्राची लोकधारा यांचा संगम पाहायला मिळाला. मिरवणुकीच्या अग्रभागी शीख तरुणांची थरारक गतका प्रात्यक्षिके लक्ष वेधून घेत होती, तर हजारो शालेय विद्यार्थिनींनी सादर केलेले लेझिम नृत्य आणि ढोल-ताशांचा गजर वातावरणात उत्साह भरत होता. एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी हातात मानवता की सच्ची मिसाल आणि हिंद दी चादर असे फलक घेऊन सामाजिक संदेश दिला.

नगर कीर्तन गुरुद्वारा गेट क्रमांक १ वरून गुरुद्वारा चौक, महावीर चौक, वजिराबाद, तिरंगा चौक, रामसेतू, रवी नगर, नागार्जुन स्कूल मार्गे मुख्य कार्यक्रमस्थळी म्हणजेच मोदी मैदान येथे पोहोचले.

**शालेय विद्यार्थ्यांकडून स्वागत**

गेट क्रमांक १ ते मोदी मैदान या अंदाजे चार किलोमीटरच्या मार्गावर एक अद्भुत दृश्य पाहायला मिळाले. या रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी हजारो शालेय विद्यार्थ्यांनी रांगा लावून शिस्तीत उभे राहत रथाचे भव्य स्वागत केले आणि गुरु ग्रंथ साहिबजींचे दर्शन घेतले. विद्यार्थ्यांनी केलेली फुलांची उधळण आणि त्यांचा उत्साह पाहून उपस्थित भारावून गेले. या संपूर्ण मार्गावर नांदेडकरांनी आपल्या घरांसमोर सडा-रांगोळी काढून नगर कीर्तनाचे जंगी स्वागत केले.

## सुपरस्टार धनुष आणि मृणाल ठाकूरचे गुप्त विवाह? चेन्नईत व्हायरल व्हिडिओने उधळली अफवा

**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून दाक्षिणात्य सुपरस्टार धनुष मराठमोळ्या अभिनेत्री मृणाल ठाकूरसोबत लग्न करणार असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. काही दिवसांपूर्वीच धनुषचा घटस्फोट झाला असल्यामुळे, त्याने आयुष्यात पुढे जाण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले जात होते. याच पार्श्वभूमीवर धनुष एका अभिनेत्रीसोबत डेट करत असल्याच्या अफवाही सोशल मीडियावर जोर धरत होत्या.

अलीकडेच या चर्चामध्ये आणखी खळबळ उडवणारा एक व्हिडिओ व्हायरल झाला. या व्हिडिओत दावा केला जात होता की धनुष आणि मृणाल ठाकूर यांनी २२ जानेवारी २०२६ रोजी चेन्नईत पारंपरिक दक्षिण भारतीय रीतिरिवाजांसह लग्न केले आहे. व्हिडिओत धनुष पांढरी लुंगी आणि गोल्ड बॉर्डर असलेल्या शर्टमध्ये दिसत आहेत, तर मृणाल ठाकूर मारून रंगाच्या साडीत खूप सुंदर दिसत आहेत.

व्हिडिओत तमिळ सुपरस्टार थलापती विजय, दुल्कर सलमान, अजित कुमार, संगीतकार अनिरुद्ध रविचंदर, आणि अभिनेत्री त्रिशा व श्रुती हासन यांसारखे बडे कलाकारही उपस्थित असल्याचे दाखवले गेले होते. सोशल मीडियावर हा व्हिडिओ प्रचंड व्हायरल झाला आणि यामुळे प्रेक्षकांमध्ये खूप उत्सुकता निर्माण झाली.

# सेवाभाव, समता आणि बंधुतेचा संदेश देणारी 'लंगर सेवा' 'हिंद दी चादर' कार्यक्रमाचे वैशिष्ट्य, लाखो भाविकांनी घेतला सेवेचा लाभ

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे आयोजित भव्य धार्मिक व ऐतिहासिक कार्यक्रमात लंगर सेवेच्या माध्यमातून सेवाभाव, समता व मानवतेचे अनोखे दर्शन घडत आहे. धर्म, जात, भाषा, प्रांत यांचा कोणताही भेद न करता हजारो भाविकांना एकत्र बसवून भोजन देणारी ही लंगर परंपरा या कार्यक्रमाची खरी आत्मा ठरते आहे.

हिंद-दी-चादर कार्यक्रमासाठी विविध राज्यासह महाराष्ट्राच्या विविध जिल्हयातून भाविक या कार्यक्रमात सहभागी झाले आहेत. या भाविकांना मुख्य मंडपालगत उभारण्यात आलेल्या





८ मंडपाच्या माध्यमातून लंगर सेवा दिली जात आहे. लंगर सेवा ही केवळ भोजन व्यवस्था नसून मानवी समानतेचा आणि नि:स्वार्थ सेवेचा संदेश देणारी गौरवशाली परंपरा आहे. 'सर्व मानव समान आहेत' या तत्त्वावर आधारित ही सेवा हिंद-दी-चादर कार्यक्रमात अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येत असून, लाखो भाविक, साधुसंत, नागरिक, स्वयंसेवक आणि पाहुण्यांना भोजन देण्यात येत आहे.

**स्वयंसेवकांचा सेवायज्ञ**

या लंगर सेवेत शीख बांधवांसह विविध सामाजिक संस्था, युवक-युवती, महिला, स्वयंसेवक मोठ्या उत्साहाने सहभागी झाले आहेत. भाजी कापणे, पोळ्या तयार करणे, अन्न शिजवणे, स्वच्छता राखणे, पंगतीत सेवा करणे ही कामे प्रत्येक कामात 'सेवा हीच साधना' या भावनेतून स्वयंसेवक करीत आहेत. अनेक जण तर पहाटेपासून उशिरा रात्रीपर्यंत न थकता सेवा देत आहेत.

**समतेचे प्रत्यक्ष दर्शन**

लंगरमध्ये श्रीमंत-गरीब, स्त्री-पुरुष, वृद्ध-लहान असा कोणताही भेद नाही. सर्वजण एकाच पंगतीत, जमिनीवर बसून भोजन ग्रहण करतात. यामुळे सामाजिक समतेचे प्रत्यक्ष दर्शन भाविकांना घडत आहे.

**नेटके व्यवस्थापन**

जिल्हा प्रशासन, महानगरपालिका आणि स्वयंसेवी संस्थांच्या समन्वयातून लंगर सेवेचे उत्तम नियोजन करण्यात आले आहे. स्वच्छता, शुद्ध पाणी, आरोग्य तपासणी याकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# उशिरानं दिलेला न्याय हा कधीही न्याय ठरत नाही

## एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्यासमोरच सरन्यायाधीशांचं परखड मत

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** सर्वोच्च न्यायालयचे सरन्यायाधीश सूर्यकांत शनिवारी आपल्या पहिल्या मुंबई भेटीवर होते. याचं औचित्य साधत मुंबई उच्च न्यायालयातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. गेट वे ऑफ इंडियाजवळील हॉटेल ताज पॅलेसमध्ये आयोजित एका सोहळ्यात हा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री. चंद्रशेखर व इतर न्यायमूर्तींसह राज्याचे दोन्ही उमुख्यमंत्री हजर होते. यानिमित्तानं राज्यातील सत्तासंघर्षाच्या केंद्रस्थानी असलेले एकनाथ शिंदे आणि अजित पवार सरन्यायाधीशांसोबत एकाचवेळी एकाच मंचावर उपस्थित असल्याचं पाहायला मिळालं.

दीडशे वर्षांहून अधिक गौरवशाली परंपरा असलेल्या, देशातील सर्वात जुन्या व प्रतिष्ठित न्यायसंस्थांपैकी एक असलेल्या मुंबई उच्च न्यायालयाच्या या ऐतिहासिक परंपरेत भारताच्या सरन्यायाधीशांचा सत्कार होणं हे अत्यंत गौरवास्पद असल्याचं यावेळी सूर्यकांत यांनी सांगितलं. मुंबई उच्च न्यायालय ही केवळ एक संस्था नसून ती एक संस्कृती आहे. या वास्तूनं देशाच्या न्यायव्यवस्थेची शान कायमच वाढवली. मुंबई उच्च न्यायलयानं कायमच देशातील इतर न्यायालयांसमोर एक आदर्श घालून दिलाय. उच्च न्यायालय तेव्हाच योग्य न्यायदान करतात जेव्हा तिथले न्यायमूर्ती कुठल्याही दबावाविना खुल्या मानसिकतेनं वागतात, आणि तिथले वकील योग्य कायदेशीर गोष्टी त्यांच्यासमोर मांडतात. महाराष्ट्राचा पसारा आणि आवाका पाहता इथं कोल्हापुरच्या रूपात एक नवं खंडपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल सरन्यायाधीशांनी राज्य सरकारचेही यावेळी आभार मानले की, त्यांनी न्यायव्यस्थेच्या गरजा लक्षात घेत हा निर्णय घेतला.

ज्येष्ठ कायदेतज्ञ फली नरिमन यांच्या स्मृती जागवणाऱ्या एका कार्यक्रमात सरन्यायाधीश सूर्यकांत यांचं व्याख्यान आयोजित करण्यात आलं होतं. उशिरानं दिलेला न्याय हा कधीही न्याय ठरत नाही, तो न्याय नाकारणंच असतं. न्यायसंस्थेनं वेळीच हस्तक्षेप न करणं हे सर्वसामान्य नागरिकांच्या अधिकारांचं एकप्रकारे हननचं आहे, या शब्दांत देशाचे सरन्यायाधीश यांनी न्याय वेळेत होणं किती महत्त्वाचं आहे हे सांगताना स्पष्ट केलं. एखाद्या शेतकऱ्याची जमीन हिसकावली जाते, एखाद्या विद्यार्थ्याला शैक्षणिक दाखला मिळत नाही तेव्हा तो आशेनं न्यायालयात येतो. अश्यावेळी जर न्यायालयानं तातडीनं त्याला दिलासा दिला नाही, तर त्याचा न्यायसंस्थेवर विश्वासच राहणार नाही. त्यामुळं न्यायालयाचा एखाद्या प्रकरणात वेळीच हस्तक्षेप होणं अत्यंत गरजेचं आहे. तरच त्यांचा न्यायव्यवस्थेवर विश्वास




कायम राहील, असं सरन्यायाधीश म्हणाले.

''राज्यातील न्यायव्यवस्थेनं राज्य सरकारच्या कारभारावर अंकुश ठेवायला हवा. सर्वसामांन्यांच्या याचिकांना प्राधान्य द्यायला हवं. देशातील उच्च न्यायालयं ही देशाच्या संविधानिक आराखड्यात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. नागरिकांसाठी एखाद्या रास्त विषयावर दाद मागण्यासाठी ते त्यांच्या हक्काचं व्यासपीठ मिळवून देतात, जेव्हा राज्यात कायदा व नियम पायदळी तुडवले जातात तेव्हा नागरिकांना न्यायालयाचाच आसरा असतो. उच्च न्यायालय हे राज्यातील नागरिकांकरता त्यांच्या मुलभूत अधिकारांची रक्षा करण्याकरता मोलाची भूमिका बजावतात. त्यामुळे खऱ्या अर्थानं राज्यातील उच्च न्यायालय हेच तिथल्या नागरिकांचं संविधानि न्यायालय असतं. भलेही सर्वोच्च न्यायालयाचा शब्द हा शेवटचा असतो, मात्र उच्च न्यायालयाची भूमिक तो शब्द देण्याआधी त्यांना विचारात घ्यावीच लागते,'' असंही सरन्यायाधीश म्हणाले.

''अन्यायाला सर्वात आधी वाचा फोडली जाते ती उच्च न्यायालयातच, पर्यावरणीय समस्या, प्रशासनाचा अनागोंदी कारभार, अनास्था याबाबत सर्वात आधी उच्च न्यायलयात वाचा फोडली जाते. त्यामुळे न्यायदानात त्यांचं महत्त्व कधीच कमी होणार नाही. एखादं प्रकरण न्यायालयापुढं आलं नाही आणि ते येणं महत्त्वाचं असतं तेव्हा सुमोटो याचिकेच्या माध्यमातून ते स्वत:हून सुनावणीला घेण्याचाही उच्च न्यायालयाकडे अधिकार असतो. कैद्यांचे अधिकार, मोलमजुरी करणाऱ्या कामगारांच्या अधिकारांनाही जपण्याचं काम उच्च न्यायालयानं वेळोवेळी केलंय. बदलत्या काळासह उच्च न्यायलयानंही आपलं रूप बदललं. टेक्नॉलॉजीच्या युगात आज घरात बसूनही तुम्ही न्यायालयात काय चाललंय ते पाहू शकता. कोरोनाकाळातील लॉकडाऊननं खरं तर जगाल दिलेली ही एक मोठी उपलब्धी आहे, त्यामुळे न्याय व्यवस्थेनंही ते जास्तीत जास्त आत्मसात करायलं हवं,'' असंही सरन्यायाधीश म्हणाले.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांचा जन्म हरियाणातील एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. देशातील सर्वोच्च न्यायिक पदापर्यंतचा प्रवास हा परिश्रम, निष्ठा, बुद्धिमत्ता आणि लोकशाही मूल्यांचा प्रेरणादायी दाखला देणारा आहे. पंजाब व हरियाणा उच्च न्यायलयात काम पाहिल्यानंतर हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती ते भारताचे सरन्यायाधीश असा त्यांचा प्रवास सर्वांसाठीच प्रेरणादायी आहे. देशातील प्रलंबित खटले निकाली काढण्यासाठी त्यांनी आजवर घेतलेले निर्णय आणि न्यायालयीन प्रशासनातील सुधारणा करण्यात त्यांचा मोलाचा वाटा राहिलाय. सरन्यायाधीश म्हणून सूर्यकांत यांना आगामी १५ महिन्यांचा कार्यकाळ मिळणार आहे. देशातील संवैधानिक मूल्य, सामाजिक न्याय आणि समानतेला अधिक बळ देण्याचा प्रयत्न सर्वजण मिळून करतील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

## ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटीसाठी भारताचा महिला संघ जाहीर, 'या' ३ खेळाडूंना पहिल्यांदाच मिळाली संधी; तर कर्णधार

नवी दिल्ली: भारताचा पुरूष संघ कसोटी क्रिकेटपासून दूर असताना आता टीम इंडियाच्या चाहत्यांना महिला संघाचा कसोटी सामना पाहण्याची संधी मिळणार आहे. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्त्वाखाली भारतीय संघ फेब्रुवारीमध्ये ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार आहे. यादरम्यान दोन्ही संघांमध्ये तिन्ही फॉरमॅटमध्ये मालिका खेळवली जाणार आहे. यामधील कसोटी सामन्यासाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे.

भारतीय संघ फेब्रुवारी-मार्चमध्ये ऑस्ट्रेलियाचा दौरा करणार आहे, जिथे संघ एकदिवसीय आणि टी-२० मालिका खेळतील. या दोन मालिकांनंतर, दौऱ्याचा शेवट पर्थमध्ये होणाऱ्या एकमेव कसोटी सामन्याने होईल. ऑस्ट्रेलियाच्या घरच्या मैदानावर होणारी ही मालिका ऑस्ट्रेलियाची कर्णधार एलिसा हिली तिच्या कारकिर्दीतील अखेरचा सामना खेळणार आहे. एलिसाने काही दिवसांपूर्वीच भारताविरूद्धची मालिका खेळत निवृत्त होणार असल्याचं सांगितलं.

७ ते ९ मार्च २०२६ दरम्यान भारत आणि ऑस्ट्रेलिया महिला संघांमध्ये कसोटी सामना खेळवला जाणार आहे. हरमनप्रीत कौर पुन्हा एकदा संघाचे नेतृत्व करणार आहे, तर स्मृती मानधना उपकर्णधार असेल. तर सलामीवीर शफाली वर्मानेही तिच्या अलीकडील चांगल्या फॉर्ममुळे संघात स्थान मिळवलं आहे. या दौऱ्यासाठी पहिल्यांदाच काही खेळाडूंना कसोटी संघात स्थान मिळालं आहे, ज्यात प्रतिका रावलचा समावेश आहे. ऑक्टोबर २०२५ मध्ये झालेल्या विश्वचषकादरम्यान तिला दुखापत झाली होती, ज्यामुळे ती उपांत्य फेरी आणि अंतिम फेरीत खेळू शकली नाही.

प्रतिका रावल वुमन्स प्रीमियर लीगमध्ये देखील खेळत नाहीये आणि याचबरोबर ती ऑस्ट्रेलियाविरूद्धच्या टी-२० व वनडे मालिकेतूनही बाहेर झाली आहे. पण कसोटी संघात मात्र तिची निवड करण्यात आली आहे. प्रतिका व्यतिरिक्त, आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत क्रिकेटमध्ये सातत्याने चांगली कामगिरी करणाऱ्या तीन तरुण खेळाडूंना कसोटी संघात संधी मिळाली आहे. त्यात अष्टपैलू अमनजोत कौर आणि तरुण वेगवान गोलंदाज क्रांती गौड यांचा समावेश आहे.

## मुहूर्त ठरला! पुण्याला महापौर कधी मिळणार?

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौर पदाच्या निवडणुकीबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे. ३०-३१ जानेवारीपर्यंत पार पडणं अपेक्षित असणारी ही निवडणूक आता लांबणीवर पडली असून, नव्या महापौरांच्या निवडीसाठी आता ६ फेब्रुवारी हा मुहूर्त निश्चित करण्यात आला आहे. प्रशासकीय कारणांमुळे हा बदल करण्यात आल्याचे समजते. पुणे महानगरपालिकेने महापौर निवडणूक प्रक्रियेसंदर्भात विभागीय आयुक्तांना पत्र पाठवून मार्गदर्शन आणि तारखेबाबत विचारणा केली होती. या पत्रावर सविस्तर चर्चा झाल्यानंतर विभागीय आयुक्तांनी निवडणुकीसाठी ६ फेब्रुवारी ही तारीख निश्चित केली आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या चर्चेला पूर्णविराम मिळणार आहे. विभागीय आयुक्तांनी दिलेल्या निर्देशानुसार, ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता महानगरपालिकेची पहिली विशेष सभा बोलावण्यात आली आहे. याचवेळी महापौर आणि उपमहापौर पदासाठी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या सभेच्या अध्यक्षतेसाठी कोणाची नियुक्ती केली जाते, याकडेही आता सर्वांचे लक्ष लागले आहे. निवडणूक लांबणीवर पडल्यामुळे राजकीय पक्षांना आता मोर्चेबांधणीसाठी अधिक वेळ मिळाला आहे. इथं भाजपला स्पष्ट बहुमत मिळालं आहे. पण महापौर पदासाठी इच्छुकांनी प्रचंड गर्दी केली आहे. आपल्या नावाची वर्णी लावण्यासाठी वरिष्ठ नेत्यांकडून फिल्डिंग लावली जात आहे. पण महापौर पदाची माळ कुणाच्या गळ्यात पडणार? पुण्याचा कारभारी कोण होणार? याचं चित्र आता ६ फेब्रुवारीलाच स्पष्ट होईल.

# अहिल्यानगर ड्रग्ज प्रकरण : मोठे मासे बाहेर काढा, अन्यथा मीच नावं जाहीर करेन; सुजय विखेंचा पोलिसांना इशारा

**दैनिक आपला विदर्भ**

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :'** जिल्हा पोलीस दलातील स्थानिक गुन्हे शाखेचा कर्मचारीच ड्रग्ज रॅकेटमध्ये अडकल्याची धक्कादायक बाब समोर आल्यानं संपूर्ण जिल्हा हादरला आहे. एमडी ड्रग्ज प्रकरणात हवालदार शामसुंदर गुजर यांना पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेनं अटक केल्यानंतर पोलीस खात्याची प्रतिमा मलीन झाली. या घटनेमुळे प्रशासनासह राजकीय वतुर्ळातही खळबळ उडाली असून प्रकरणाला आता राजकीय वळण मिळालं आहे.

सुजय विखेंची सखोल चौकशीची मागणी : भाजपाचे माजी खासदार सुजय विखे पाटील यांनी या प्रकरणावर तीव्र आणि स्फोटक प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी पोलीस प्रशासनालाच थेट इशारा देत गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. ''प्रत्येक गंभीर गुन्हा पारनेर तालुक्याशीच का जोडला जातो?'' असा सवाल उपस्थित करत या प्रकरणामागे मोठे मासे असल्याचा थेट आरोप त्यांनी केला आहे. तसेच, या संपूर्ण प्रकरणात राजकीय



हस्तक्षेपाचा संशय व्यक्त करत निष्पक्ष आणि सखोल चौकशीची मागणी त्यांनी केली आहे.

आठवडाभरात सर्व नावं जाहीर करा, अन्यथा... : अहिल्यानगर जिल्ह्यात उघडकीस आलेल्या एमडी ड्रग्ज प्रकरणामुळे खाकीवर काळा डाग लागला असून या प्रकरणानं गंभीर वळण घेतलं आहे. विखे पाटलांनी पोलीस प्रशासनाला थेट अल्टिमेट देत आठवडाभरात सर्व संबंधित नावं जाहीर करण्याची मागणी केली आहे. अन्यथा ही नावं आपण स्वत: जाहीर करू, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला आहे. या प्रकरणात आरोपी ठरलेला पोलीस कर्मचारी शामसुंदर गुजर यांची पारनेरवरून स्थानिक गुन्हे शाखेत बदली कोणाच्या शिफारशीवर करण्यात आली? असा गंभीर प्रश्नदेखील विखे पाटलांनी उपस्थित केला आहे. तसेच, एमडी ड्रग्ज पारनेरमध्ये नेमक्या कोणाच्या घरी ठेवण्यात आले होते, या प्रकरणात सहभागी असलेले दोन व्यक्ती कोणत्या राजकीय पक्षाचे किंवा कोणाचे कार्यकर्ते आहेत, हेही स्पष्ट व्हावं, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

ड्रग्ज प्रकरणात पोलिसाचं नाव आल्यानं नागरिकांमध्ये संताप : पुणे ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखा व शिरूर पोलीस ठाण्याच्या पथकाने मंगळवार (२० जानेवारी) शिरूर शहरात कारवाई करत १ किलोहून अधिक मेफेड्रोन (एमडी) जप्त केलं होतं. या कारवाईत गॅरेज चालक शादाब शेख याला अटक करण्यात आली असून त्यानंतर संपूर्ण ड्रग्ज रॅकेटचा पर्दाफाश झाला आहे. तपासादरम्यान एक धक्कादायक बाब समोर आली असून अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेतील नार्कोटिक टेबलची जबाबदारी सांभाळणारे हवालदार शामसुंदर गुजर थेट ड्रग्ज रॅकेटमध्ये सहभागी असल्याचं उघड झालं आहे. या गंभीर प्रकरणानंतर पुणे ग्रामीण पोलिसांनी गुजर यांना अटक केली. या घटनेमुळे अहिल्यानगर पोलीस दलाची प्रतिष्ठा अक्षरश: धुळीस मिळाली असून संपूर्ण जिल्ह्यात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. ड्रग्जसारख्या गंभीर गुन्ह्यात खाकीचा सहभाग कसा असू शकतो? असा संतप्त सवाल आता सर्वसामान्यांकडून उपस्थित केला जात आहे.

ड्रग्ज प्रकरणामागे राजकीय हस्तक्षेप? : या संपूर्ण घडामोडींमुळे ड्रग्ज प्रकरणात राजकीय आशीर्वाद आहे का? असा गंभीर प्रश्न आता जनतेतून उपस्थित केला जात आहे. पोलीस प्रशासन या प्रकरणावर मौन बाळगणार की ठोस कारवाई करणार, याकडं संपूर्ण जिल्ह्याचं लक्ष लागलं आहे. ड्रग्ज प्रकरणातील मोठे मासे नेमके कोण, संबंधित पोलिसांची नावं कधी जाहीर होणार, तसेच आठवड्यानंतर सुजय विखे पाटील नेमके काय खुलासे करणार? याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. सध्या अहिल्यानगरचे राजकारण आणि खाकी दोन्ही संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत.

## मित्राच्या बायकोवर वाईट नजर, एकटीला पाहून घरात घुसायचा अनब...

**पाचोड/प्रतिनिधी :'** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या पैठण तालुक्यात मैत्रीच्या नात्याला काळीमा फासणारी घटना उघडकीस आली आहे. येथील एका तरुणाने आपल्या जीवलग मित्राच्या पत्नीवर लैंगिक अत्याचार केला आहे. आरोपी एवढ्यावरच थांबला नाही, तर त्याने मित्राला जीवे मारण्याची देखील धमकी दिली. आरोपी मागील काही दिवसांपासून वारंवार पीडितेचं लैंगिक शोषण करत होता. या प्रकरणी पाचोड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. पोलिसांनी आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. अमोल विजय कुलट (वय १९, रा. दाभरुळ, ता. पैठण) असं अटक करण्यात आलेल्या आरोपीचं नाव आहे. आरोपी अमोल आणि पीडितेचा पती हे लहानपणापासूनचे जिवलग मित्र होते. यामुळे अमोलचं पीडितेच्या घरी सतत येणं-जाणं असायचं. कुटुंबातील सदस्य म्हणून त्याच्यावर विश्वास ठेवला जात होता, मात्र याच विश्वासाचा त्याने गैरफायदा घेतला. जानेवारी २०२५ मध्ये आरोपीने पहिल्यांदा पीडितेच्या असहायतेचा फायदा घेतला. तिची बदनामी करण्याची धमकी देऊन त्याने पहिल्यांदा तिच्यावर बळजबरी केली. त्यानंतर पीडितेच्या मनात भीती निर्माण करून त्याने हे पाशवी कृत्य वारंवार सुरूच ठेवले. १८ जानेवारीच्या रात्री पीडितेचा पती काही कामानिमित्त घराबाहेर असताना, अमोलने पुन्हा संधी साधली. त्याने घरात घुसून पीडितेला बेदम मारहाण केली आणि तिच्यावर अत्याचार केला. ''कोणाला काही सांगितल्यास तुला आणि तुझ्या पतीला जीवे मारीन,'' अशी धमकी त्याने दिली. २० जानेवारी रोजी त्याने पुन्हा घराकडे येत जातीवाचक शिवीगाळ करत पतीला संपवण्याची धमकी दिली.


## शब्दकोडे क्र. 70

आडवे शब्द

१. गाळ पण टाकाऊ नाही २अ. ताळतंत्र सुटलेला ५. रोड टॅक्स-मराठीत ८. तोंडाचा पट्टा ११. पुरणपोळीबरोबर केली जाणारी आमटी १२. अटीची भाषा १४. चीज, वस्तू १५. त्याग केला १७. अर्धांगवायू १९. ढीग २१. सत्ता २३. उत्तराधिकारी २४. वाघाची मावशी २५. शेवट, नाश२६. मालक, सरदार, शासनसत्ता २८. पाण्यापासून उत्पन्न ३१. चामखीळ ३३. एकरूप ३४. झाडाचे टॉनिक ३५. सरस्वती (ग्रा.) ३६. बातमी ३७. वारा, त्रास ३८. भांडण ४०. कैफ, धुंदी ४२. कधी मर्दानगीचे कधी भिकारपणाचे लक्षण ४३. नऊ भावना ४५. कडक व चिवट ४६. एक देवयोनी, स्वर्गातील गायक ४७. संत, अवलिया ४८. रागाचा ठिकाणा ४९. गंमत, मजा ५०. स्वयंपाकी ५३. आवाजांचा गोंधळ ५४. सन्मानाची रक्कम ५६. खोदकाम ५८. पुत्री, मुलगी ६०. लाकडी जिना ६२. दात ६४. जबरदस्त, धिप्पाड ६७. चेहऱ्यावरील कांती ६८. काळ्या तोंडाचे माकड ७०. राजपुत्र सलीमची प्रेयसी ७२.सवाद्य ७४. हिंदीत झणझणीत ७५. गायीचे पिल्लू ७७. शिक्षा ७८. मोगऱ्याची माळ ८०. खूळ ८२. अगदी सरळ ८३. दुसऱ्याच्या मनातील जाणणारा ८४. रश्शावरील तवंग, कट

उभे शब्द

१. उमदा, रंगेल २. बतावणी ३. आलेख- चढता वा उतरता ४. पुरुष ५. घागरा ६. बटवा ७. रमापती ८. पृथ्वी, गाय ९. पूर्ण भरतीची वेळ १०. सिंह १३. समशेर १६. पुत्र (हिंदी) १८. दिवस २०. लिंबू पाणी २२. गंध २४. पतंगाचा धागा २५. अकस्मात २६अ. ईदने सांगता होणारा उपवासाचा महिना २७. खोकला २८. पाणी देणारा २९. फळातील द्रव ३०. वस्ती ३२. जास्तीत जास्त व कमीत कमी ३३. टोळीचा प्रमुख ३४. धोकादायक ३७. संधी ३९. बरोबर आलेला फौजफाटा ४१. शिक्षा ४३. पाताळात भोगाव्या लागणाऱ्या वेदना ४४. संपूर्ण ५०. घराणे ५१. शर्करा ५२. पाडाव, हार ५५. फायदा ५७. पुरुष ५९. वनवास ६१. दार ६३. हुण्डा (हिंदी) ६५. घरंदाज, कुलीन स्त्री ६६. टपालकचेरी ६९. मत देणे ७१. मुंग्यांचे घर ७३. धट्टकट्टा ७६. फटाक्यांची माळ ७७. उथळ पसरट वाटी ७९. रात्र ८१. निर्माण झालेले अंतर



### शब्दकोडे क्र. 69 चे उत्तर

आडवे उत्तर

१.छाना २अ.बेभान ५.पथकर ८.वसवस ११.कट १२.जरतर १४.सामानसुमान १५.टाकला १७.लकवा १९.रास २१.लवाद २३.वारदार २४.मांजर २५.अस्त २६.सरकार २८.नीरजा ३१.मस ३३.समरस ३४.खत ३५.सारजा ३६.समाचार ३७.वात ३८.कलह ४०.नशा ४२.दाढी ४३.नवरस ४५.वातड ४६.किन्नर ४७.पीर ४८.नाक ४९.मौज ५०.खानसामा ५३.कलकल ५४.मानधन ५६.खनन ५८.तनया ६०.दादर ६२.रदन ६४.तगडा ६७.रया ६८.वानर ७०.अनारकली ७२.वाजतगाजत ७४.तीखा ७५.वासरू ७७.सजा ७८.गजरा ८०.नाद ८२.सरळसोट ८३.मनकवडा ८४.तर्री

उभे उत्तर

१.छाकटा २.नरम ३.भाजणी ४.नर ५.परकर ६.कसा ७.रमावर ८.वसुधा ९.समा १०.वनराज १३.तलवार १६.ताल १८.वासर २०.सरबत २२.वास २४.मांजा २५.अचानक २७.कास २८.नीरद २९.रस ३०.वसाहत ३२.कमालकिमान ३३.सरदार ३४.खतरनाक ३७.वाव ३९.लवाजमा ४१.शासन ४३.नरकयातना ४४.सकल ५०.खानदान ५१.साखर ५२.पतन ५५.नफा ५७.नर ५९.अरण्यवास ६१.दरवाजा ६३.दहेज ६५.गरती ६६.डाकखाना ६९.मतदान ७१.वारूळ ७३.तगडा ७६.सर ७७.सट ७९.रात ८१.दरी

## वृत्तविशेष...

### भाजपच्या खारेपाटण जि.प.उमेदवार प्राची इस्वालकर बिनविरोध

दैनिक आपला विदर्भ

**कणकवली/प्रतिनिधी :** तालुक्यात सुरू असलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत भाजपाकडून ठाकरे सेनेला सलग धक्के दिले जात आहेत. सलग दुसऱ्या दिवशी खारेपाटण जिल्हा परिषद मतदार संघातील ठाकरे सेनेच्या उमेदवार मीनल तळगावकर यांनी जिल्हा परिषद सदस्य पदाच्या निवडणूक रिंगणातून माघार घेतली. त्यामुळे या मतदार संघातील भाजपाच्या उमेदवार प्राची इस्वलकर या बिनविरोध निवडून आल्या आहेत.

या घडामोडींमुळे कणकवली तालुक्यात भाजपाकडून बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांची संख्या ३ झाली असून, कणकवली विधानसभा मतदारसंघात ही संख्या एकूण ४ पोहोचली आहे.

पालकमंत्री . नितेश राणे यांचे 'दे धक्का तंत्र' सध्या केवळ मतदार संघातच नव्हे, तर राज्यभरात चर्चेचा विषय ठरत आहे. मीनल तळगावकर यांच्या माघारीच्या निर्णयामुळे ठाकरे सेनेला हा मोठा राजकीय धक्का मानला जात आहे.

विशेष म्हणजे शनिवार असूनही निवडणूक प्रक्रियेमुळे निवडणूक कार्यालय सुरू ठेवण्यात आले होते. दुपारी ३ वाजेपर्यंत आणखी कोण उमेदवार माघार घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले होते. कालच या मतदार संघातील अपक्ष उमेदवार उज्ज्वला चिके यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला होता. त्यानंतर आज ठाकरे शिवसेनेच्या एकमेव विरोधी उमेदवार मीनल तळगावकर यांनीही माघार घेतल्याने प्राची इस्वलकर या या मतदार संघातील एकमेव उमेदवार राहिल्या. दरम्यान, 'दे धक्का' तंत्राचा मोठा फटका २७ जानेवारी रोजी उमेदवारी अर्ज माघार घेण्याच्या शेवटच्या दिवशी आणखी बसण्याची शक्यता आहे.

### भिवंडीमध्ये मानवतेला काळीमा; कॅन्सरशी झुंज देणाऱ्या पत्नीवर हुंड्यासाठी, पतीसह सात आरोपींवर गुन्हा

दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी/प्रतिनिधी :** कर्करोगाच्या चौथ्या टप्प्यात उपचार सुरू असताना एका महिलेवर हुंड्याच्या हव्यासापोटी अमानुष छळ केल्याचा गंभीर प्रकार भिवंडीत उघडकीस आला आहे. पीडितेच्या थेट तक्रारीनंतर पती आणि सासरच्या सदस्यांविरोधात महाराष्ट्रातील अंधश्रद्धा व अमानवी प्रथा प्रतिबंधक कायद्यानुसार कठोर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

३६ वर्षीय पीडित महिला सध्या भिवंडीमध्ये वास्तव्यास असून ती जीवघेण्या आजाराशी लढा देत आहे. पोलिस तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, विवाहानंतर अनेक वर्षे हुंड्याच्या मागणीसाठी तिला शारीरिक तसेच मानसिक त्रास दिला जात होता. आजारपणालाच कारणीभूत धरत तिला अपशकुनी ठरवून अघोरी कृत केल्याचा आरोप तिने केला आहे.

तक्रारीप्रमाणे, गंभीर आजाराचे निदान झाल्यानंतर उपचारासाठी मदत करण्याऐवजी छळ अधिक तीव्र करण्यात आला. डिसेंबर २०२५ मध्ये पतीने तिला अल्पवयीन मुलासह घराबाहेर काढले. यावेळी तिच्या बहिणी आणि मुलावर मारहाण झाल्याचेही समोर आले आहे.

यानंतर जानेवारी २०२६ मध्ये पीडित महिला राहत असलेल्या घराबाहेर जादूटोणाशी संबंधित साहित्य ठेवण्यात आल्याची घटना घडली. हा प्रकार केवळ मानसिक दहशत निर्माण करण्यासाठी नव्हे, तर गंभीर धोका निर्माण करण्याच्या उद्देशाने केल्याचा संशय पोलिसांनी नोंदवला आहे.

या प्रकरणात पती योगेशकुमार केशरवानी याच्यासह त्याचे आई-वडील आणि इतर नातेवाइकांविरोधात भारतीय न्याय संहितेतील गंभीर कलमे तसेच महाराष्ट्र नरबळी व अमानुष, अनिष्ट प्रथा प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. निजामपूरा पोलीस ठाण्याचे अधिकारी या प्रकरणाचा तपास करत असून आरोपींच्या भूमिकेबाबत सखोल चौकशी सुरू आहे.

### डोंबिवलीत हप्ता घेऊनही पालिकेने मराठी तरुणीचा स्टॉल उचलला, राज ठाकरेंनी अविनाश जाधवांना पाठवलं, म्हणाले, '

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** डोंबिवलीत शॉरमा विकणाऱ्या एकता सावंत या मराठी व्यवसायिकेवर पालिकेकडून कारवाई करण्यात आलीय. मात्र माझ्याकडून रोज ३०० रुपये हप्ता घेऊन सुद्धा हि कारवाई केलीय. शिवाय पालिकेकडून फक्त माझ्याच स्टॉलवर कारवाई केली जात असून इतर हातगाडी आणि फेरीवाल्यांना केडीएमसीचे अधिकारी पाठीशी घालत असल्याचा दावा केला होता. एकता सावंत या रिलस्टार असून त्यांच्या रिल्सला मिलियनमध्ये व्हिव्ह मिळतात. तर त्यांचे लाखापेक्षा अधिक फॉलोवर आहे.दरम्यन, पालिकेकडून करण्यात आलेल्या कारवाई संदर्भात सावंत यांनी नुकताच एक व्हिडीओ इंस्टाग्रामवर पोस्ट करत आपली कैफियत मांडली. त्यांनतर या इंस्टाग्राम पोस्टची दखल थेट राज ठाकरे यांनी घेतली आहे. परिणामी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे ठाणे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव हे डोंबिवलीत दाखल झाले असून आपण एकता सावंत यांच्या पाठीशी उभे असल्याची प्रतिक्रिया अविनाश जाधव यांनी दिलीय. तर एकता सावंत यांच्या बाबत घडलेल्या प्रकारानंतर अविनाश जाधव चांगलेच आक्रमक झाले आहे. 'दादा मला येथे टपरी टाकून द्या आणि त्या टपरीवर राज साहेबांचा फोटो टाकून द्या. मी राज साहेबांना मनातून वोट करते, तर त्यांचा फोटो गाडीवर पाहिजे. मग मला कोणीच येथून हटवू शकत नाही, अशी भावना एकता सावंत यांनी मनसे नेते अविनाश जाधवांशी बोलताना व्यक्त केली. तर यावर उत्तर देतांना अविनाश जाधव म्हणाले कि, मला राज साहेबांनीच तुला भेटायला पाठवले आहे. तुझा काय प्रॉब्लेम झाला आहे ते आपण पाहून घेऊ. असा विश्वास अविनाश जाधव यांनी यावेळी व्यक्त केलाय.

# लोकसहभागातूनच ग्रामीण क्रांती शक्य सिनेअभिनेत्री सोनाली कुलकर्णी





दैनिक आपला विदर्भ

**शेगाव/प्रतिनिधी :** ग्रामीण भागातील गावे एकत्र येऊन लोकसहभागातून काम करत असतील, तर त्यातून मोठी सामाजिक व विकासात्मक क्रांती घडू शकते, असे प्रतिपादन प्रसिद्ध सिनेअभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांनी केले. मुख्यमंत्री ग्राम समृद्ध पंचायतराज अभियानाच्या अनुषंगाने जिल्हा परिषद बुलढाणा यांच्या वतीने आयोजित संवाद दौऱ्यांतर्गत त्या बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर, नांदुरा व शेगाव तालुक्यातील कठोरा येथे दाखल झाल्या होत्या. यावेळी गावातील विकासकामांची पाहणी करताना व नागरिकांशी संवाद साधताना त्यांनी हे मत व्यक्त केले.

शेगाव तालुक्यातील कठोरा परिसरात 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या संकल्पनेअंतर्गत लोकसहभागातून कृत्रिम मातीचे बंधारे उभारण्याचे काम सुरू आहे. यामध्ये सिनेअभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांनी प्रत्यक्ष सहभाग घेत दुपारी २.३० वाजता ओढा व नदीकाठावर सुमारे ३५ ते ४५ मिनिटे श्रमदान केले. त्यांच्या उपस्थितीत बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्यात आले. त्यानंतर त्यांच्या हस्ते परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले.

या वेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी शिवशंकर भारसाकले, शेगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी चंदनसिंह राजपूत, ग्रामपंचायत अधिकारी पंकज खंडारे, सरपंच सौ. सुषमाताई खवले, जिल्हा परिषदेचे अधिकारी, कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामपंचायत व जिल्हा परिषद यांच्या वतीने आयोजित संवाद दौरा कार्यक्रमात सोनाली कुलकर्णी यांचे ग्रामस्थांच्या वतीने उस्फूर्त स्वागत करण्यात आले. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री ग्राम समृद्ध पंचायतराज अभियानाबाबत नागरिकांचा सहभाग जाणून घेतला व ग्रामविकासासाठी लोकसहभागाचे महत्त्व अधोरेखित केले.

या कार्यक्रमासाठी परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लावली होती.

### जलसंपदा मंत्री गिरीश महाजन तखत सचखंड श्री हजूर अबचल नगर साहिब जी गुरुद्वाराचे घेतले दर्शन



**नांदेड/प्रतिनिधी :** हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमास आज (दि. २४) जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी तखत सचखंड श्री हजूर अबचल नगर साहिब जी गुरुद्वारा येथे दर्शन घेतले. पवित्र गुरु ग्रंथ साहिबजी समोर माथा टेकला आणि आशीर्वाद घेतले.

### महापे एमआयडीसीतील बिटाकेम कंपनीला भीषण आग; अग्निशमन दल घटनास्थळी, आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न

**नवी मुंबई /प्रतिनिधी :** नवी मुंबईतील महापे एमआयडीसी परिसरात शनिवारी दुपारी १२:३० वाजताच्या सुमारास एका केमिकल कंपनीला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. बिटाकेम असं या कंपनीचे नाव असून केमिकल कंपनीत अचानक आग भडकल्याने औद्योगिक परिसरात खळबळ उडाली आहे. अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले असून आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत.

महापे एमआयडीसीतील 'ए-३६' समोरील पावणे एमआयडीसी भागात, डब्ल्यू-१७७ क्रमांकाच्या प्लॉटवर बिटाकेम ही केमिकल कंपनी आहे. आगीमुळे कंपनीच्या आवारातून मोठ्या प्रमाणात काळ्या धुराचे लोट उसळले असून ते दूरवर पर्यंत पसरले आहेत. यामुळे परिसरातील कामगार आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### धमकी, छळ आणि अमानुष मारहाण!

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** पुरंदर तालुक्यातील बोपगाव येथील एका विवाहितेसोबत अजब प्रकार घडला. चारित्र्याच्या संशयावरून आणि हुंड्यासाठी विवाहितेचा अमानुष छळ केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. सासरच्या जाचाला कंटाळून पीडित महिलेने सासवड पोलीस ठाण्यात धाव घेतली असून, पोलिसांनी पतीसह सासू आणि नणंदेवर गुन्हा दाखल केला आहे. भाग्यश्री हितेश पारगे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, १८ जून २०२४ पासून मे २०२५ अखेरपर्यंत त्यांचा छळ करण्यात आला. पती हितेश शिवाजी पारगे, सासू इंदुमती पारगे (रा. डोणजे, हवेली) आणि नणंद सिद्धी गणेश गोसावी (रा. सिंहगड रोड, पुणे) यांनी संगनमत करून भाग्यश्री यांना शारीरिक आणि मानसिक त्रास दिला. लग्नात अपेक्षित मानपान मिळाला नाही, या कारणावरून ही मारहाण केली जात होती.अमानुष मारहाण आणि धमक्या: आरोपी पती हितेश याने भाग्यश्री यांच्या चारित्र्यावर संशय घेऊन त्यांना वारंवार चामड्याच्या पट्ट्याने बेदम मारहाण केली. इतकेच नाही तर सोन्याची अंगठी आणि चांदीच्या भांड्यांची मागणी करत त्यांचा छळ करण्यात आला.

विरोध केल्यास माहेरच्या मंडळींना जिवे मारण्याची धमकीही देण्यात आली. या त्रासादरम्यान आरोपींनी भाग्यश्री यांचे मंगळसूत्र आणि मोबाईल हिसकावून घेत त्यांना गंभीर दुखापत केली.

सततच्या या छळाला कंटाळून भाग्यश्री यांनी अखेर पोलिसांत तक्रार दिली. या तक्रारीवरून सासवड पोलिसांनी तिन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक कुमार कदम यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

### खळबळजनक ! पेट्रोल बॉम्ब टाकून ग्रामपंचायत सदस्याच्या कुटुंबाला जिवंत जाळण्याचा प्रयत्न

**भंडारा/प्रतिनिधी :** आज पहाटेच्या सुमारास भंडारा शहराजवळील शहापूर येथे एक खळबळजनक घटना समोर आली आहे. शहापूर ग्रामपंचायत सदस्याच्या कुटुंबियांना जिवंत जाळून मारण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.भंडारा शहरापासून जवळच असलेल्या शहापूर गावात पहाटेच्या सुमारास खळबळ उडवून देणारी घटना घडली आहे. काही अज्ञात हल्लेखोरांनी ग्रामपंचायत सदस्याच्या कुटुंबाला जिवंत जाळून मारण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. कुटुंबातील सर्वांचे नशीब बलवत्तर म्हणून या घटनेत कोणतीही कुणालाही दुखापत झाली नाही की कोणतीही जीवित हानी झाली नाही. मात्र या हल्ल्यात मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

शहापूर ग्रामपंचायतीचे सदस्य सचिन गाडेकर यांच्या घरावर अज्ञात इसमांनी पेट्रोल बॉम्ब हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. पहाटेच्या सुमारास अचानकपणे गाडेकर यांच्या घराच्या आवारात पेट्रोल बॉम्ब फेकण्यात आला. या हल्ल्यामुळे घराच्या अंगणात उभ्या असलेल्या चार दुचाकी आणि घरासमोरील एक कारला भीषण आग लागली. काही मिनिटांतच ही सर्व वाहने पूर्णपणे जळून खाक झाली.

आग लागल्याचे लक्षात येताच गाडेकर कुटुंबीयांनी समयसूचकता दाखवत आरडाओरड सुरू केली. आवाज ऐकून शेजारी धावून आले. नागरिक जमा होत असल्याचे लक्षात येताच हल्लेखोरांनी घटनास्थळावरून पळ काढला. नागरिकांच्या मदतीने आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करण्यात आला, तोपर्यंत वाहनांचे मोठे नुकसान झाले होते. या हल्ल्यामागील नेमके कारण अद्याप अस्पष्ट असून, ही घटना वैयक्तिक वादातून घडली राजकीय कारणातून, याचा तपास सुरू आहे.

घटनेची माहिती मिळताच जवाहरनगर पोलीस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात येत असून, अज्ञात आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत. ग्रामपंचायत सदस्याच्या घरावर थेट पेट्रोल बॉम्ब हल्ला झाल्याने संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, या घटनेने भंडारा जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

### बदनाम करण्याचा सुनियोजित कट, शिर्डीतील गुन्हेगारीवर मौन का?

ड्रग्ज प्रकरणावरुन निलेश लंके यांचा पलटवार

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** ड्रग्ज प्रकरणावरुन सध्या अहिल्यानगरचं राजकारण तापलं आहे. माजी खासदार आणि भाजपा नेते सुजय विखे पाटील यांनी थेट पोलिसांनाच इशारा दिलाय. यावर आता राष्ट्रवादी - शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार निलेश लंके यांनी प्रत्युत्तर दिलं. ''पारनेर तालुका आणि माझी राजकीय बदनामी करण्यासाठी जाणीवपूर्वक आरोपांची मालिका रचली जात आहे,'' असा थेट आणि परखड आरोप करत खासदार निलेश लंके यांनी नगर येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत विरोधकांवर जोरदार हल्ला चढवला. ड्रग्ज प्रकरणापासून ते नगर-मनमाड रस्त्याच्या कामापर्यंत, तसेच घोटाळे आणि राजकीय स्टंटबाजीवर त्यांनी एकामागोमाग एक प्रश्न उपस्थित करत आरोपकर्त्यांची कोंडी केली.

ड्रग्ज प्रकरणात सत्य झाकण्याचा प्रयत्न सुरू आहे. एलसीबीचा कर्मचारी श्यामसुंदर गुजर ड्रग्ज प्रकरणात अडकला असून, तो पूर्वी पारनेरमध्ये कार्यरत होता. याचा संदर्भ देत निलेश लंके म्हणाले, ''ड्रग्ज नेमकं कोणाच्या घरात सापडलं? त्या कर्मचाऱ्याला एलसीबीमध्ये नेमण्यासाठी कोणी शिफारस केली? हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. मात्र, या प्रश्नांची उत्तरं देण्याऐवजी पारनेर आणि माझ्यावर आरोप करून दिशाभूल केली जात आहे.''

शिर्डीत नेमकं काय सुरू आहे? याची चौकशी का होत नाही?असा सवाल उपस्थित करत लंके यांनी गंभीर मुद्दा मांडला. ''सचिन गीधे या शेतकरी कुटुंबातील तरुणाला जाळून मारण्यात आलं. मृतदेहही मिळाला नाही. त्या प्रकरणातील आरोपी कोण? त्यावर कुणीच का बोलत नाही?'' असा संतप्त सवाल त्यांनी केला.

ग्रोअर प्रकरणातील हजार, बाराशे कोटींच्या कथित घोटाळ्यावर बोट ठेवत निलेश लंके म्हणाले, ''तो घोटाळा करणारा साळवे कोणाचा कार्यकर्ता होता? आरोपींना अटक होऊ नये म्हणून सवलत कोणी दिली? तपास एखाद्या सहाय्यक पोलीस निरीक्षकाकडंच का सोपवण्यात आला? या प्रश्नांची उत्तरं जनतेला मिळाली पाहिजेत.''

नगर-मनमाड रस्त्यावर होत असलेल्या टीकेला प्रत्युत्तर देताना लंके म्हणाले, ''पाच वर्षे खासदार असताना हा रस्ता का झाला नाही? रस्ता मृत्यूचा सापळा बनला होता. शेकडो लोकांचे बळी गेले. मी खासदार झाल्यानंतर पहिल्या ठेकेदाराला काळ्या यादीत टाकलं. नवा ठेकेदार नेमला आणि आज काम वेगानं सुरू आहे. राजकीय स्टंटबाजी नव्हे, प्रत्यक्ष कामावर भर दिला. काही लोक पाहणी करून फोटोसेशन करतात. आम्ही प्रत्यक्ष काम करतो. खासदार नसतानाही काम केलं आणि आजही करत आहोत.

# मकर संक्रांतीनिमित्त दिशा महिला बचतगट फेडरेशनतर्फे हळदी-कुंकू समारंभ संपन्न

दैनिक आपला विदर्भ




**बुलढाणा/प्रतिनिधी :** मकर संक्रांतीच्या पावन पर्वावर महिलांमधील आपुलकी, स्नेह आणि सामाजिक ऐक्य वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने दिशा बुलढाणा जिल्हा महिला बचतगट फेडरेशनच्या वतीने हळदी-कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. हा समारंभ शनिवार, दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी राजर्षी टॉवर समोर, चिखली रोड, सुंदरखेड, बुलढाणा येथे सायंकाळी ५ ते ८ या वेळेत अत्यंत आनंदी व उत्साही वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमास दिशा महिला बचतगट फेडरेशनच्या संस्थापक अध्यक्षा अॅड. जयश्रीताई शेळके या प्रमुख उपस्थित होत्या. फेडरेशनच्या वतीने महिलांमध्ये सामाजिक सलोखा, परंपरेचे जतन व सशक्तीकरणाच्या हेतूने हा उपक्रम दरवर्षी नियमितपणे साजरा करण्यात येतो. यावेळी बोलताना अॅड. जयश्रीताई शेळके म्हणाल्या की, "हळदी-कुंकू हा केवळ एक सण नसून महिलांना एकत्र आणणारा, नात्यांमध्ये गोडवा निर्माण करणारा आणि आत्मविश्वास वाढवणारा उत्सव आहे. महिलांनी स्वतःच्या पायावर उभे राहत आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, परस्पर सहकार्याने पुढे जावे आणि आपल्या संस्कृतीच्या मूल्यांना जपावे,'' असा संदेश त्यांनी दिला.

या समारंभासाठी बुलढाणा शहरातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवर महिलांची ही उपस्थिती होती. बुलढाणा शहरातील असंख्य महिलांनी या हळदीकुंकू समारंभाला भेट दिली. पारंपरिक वेशभूषा, हळदी-कुंकू आणि स्नेहपूर्ण संवादामुळे संपूर्ण वातावरण भारावून गेले होते. महिलांनी एकमेकींना मकर संक्रांतीच्या शुभेच्छा देत कार्यक्रमाचा आनंद घेतला.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी दिशा बुलढाणा जिल्हा महिला बचतगट फेडरेशन, राजर्षी शाहू ग्रामीण सहकारी पतसंस्था मर्यादित, शिरपूर (र. नं. ३३३) तसेच दिशा महिला अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी मर्यादित, बुलढाणा (र. नं. ३७५) च्या कर्मचारी स्मिता वराडे, संगीता सोनूने, कविता भागिले, सोनाली वाघ, अश्विनी फदाट, राधिका शिरसाट, स्वाती जाधव, शालिनी जाधव, मीना इंगळे,वंदना मेढे, उषा साळोक,जयश्री राऊत, रूपाली इंगळे,ज्योती नरवाडे,प्रतिभा तायडे, पल्लवी पाटील, सरला कदम, सीमा देशमुख, दिपाली राजपूत, पूजा लवंगे, पूजा शेळके,जयश्री कासवत, मनीषा चाटे, अर्चना चव्हाण,उज्वला मोहिते, आम्रपाली कांकाळ, रूपाली उबरांहांडे, सपना इंगळे, शितल सुरडकर, भारती कोल्हे, उज्वला आसने, सरला बीचकुळे, निशा हिवाळे, सविता अहिरे, शालिनी खराटे, मयुरी शिंदे, दिव्या तारोने, कीर्ती परिहार, दिपाली राजपूत यांचे मोलाचे सहकार्य लाभले.